Kvisoft PDF Merger DEMO : Purchase from www.kvisoft.com to remove the watermark


# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशी—४ महाराष्ट्र अधिनियम, १९९४(१९९४ चा महा. ३५) या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६(सत्र २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ

(विद्या विभाग)

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली — ४४२६०५ फोन:०७१३२ — २१६५५४, २२३१०४,२२३३२३


जा. क्र/गों.वि/वि.वि/ १००/२०२१ दि. १३/०१/२०२१

## परिपत्रक

विषय :— दिनांक १४ जानेवारी, २०२१ ते २८ जानेवारी, २०२१ या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करणेबाबत.

संदर्भ : क्रमांक : मभापं/०४२१/प्र.क्र.०२/मवि—१/५५ दि. ०४/०१/२०२१

याद्वारे कळविण्यात येते की, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण पुणे यांचे पत्र दिनांक ०४/०१/२०२१ अन्वये विद्यापीठ/महाविद्यालय स्तरावर मातृभाषेचा गौरव म्हणून दिनांक १४/०१/२०२१ ते २८/०१/२०२१ पर्यंत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा म्हणून साजरा करावयाचा आहे. उक्त संलग्नित शासन परिपत्रकाचे कृपया अवलोकन करावे व त्याअनुषंगाने कार्यक्रम/उपक्रमाचे आयोजन करुन संक्षिप्त अहवाल छायाचित्रासह कार्यक्रमानंतर लगेच विद्यापीठात सादर करावयाचा आहे. करीता विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्यांनी उचित कार्यवाही घ्यावी, ही विंनती.

(दिपक जुनघरे)
उपकुलसचिव (विद्या)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
विद्या विभाग
आवक क्र. 582 दि. 05/01/2021
जावक क्र. 10 दि. 06/01/2021

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 155 दि. 05/01/2021

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१


Web : www.dhepune.gov.in E-mail : mavi.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फोन नं.०२०/२६१११११५३


क्रमांक :मभापं/०४२१/प्र.क्र-०२/ मवि-१/ 55 दिनांक ०४.०१.२०२१

04 JAN 2021

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण,
२. कुलसचिव,
सर्व अकृषी /अभिमत / स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे,

**विषय - दिनांक १४ जानेवारी ,२०२१ ते २८ जानेवारी,२०२१ या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करणेबाबत.**

**संदर्भ** : १.शासन परिपत्रक क्र.- मभापं-२०२०/प्र.क्र.१२५/भाषा-२,दि.२२.१२.२०२०.
२.महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ पत्र क्र. सासंम २०२०/१७४७, दि.३१.१२.२०२०.

उपरोक्त संदर्भिय शासन परिपत्रकाची प्रत सोबत जोडली आहे,अवलोकन करावे.संदर्भीय शासन परिपत्रकातील मुद्यांच्या अनुषंगाने दि.१४ जानेवारी २०२१ ते २८जानेवारी २०२१ या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करणेबाबत दिलेल्या सूचनांनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.तसेच संदर्भिय पत्र क्र.२नुसार http://sahitya.marathi.gov.in या संकेतस्थळावर ई-बुक व पीडीएफ स्वरुपात वाचकांसाठी नि:शुल्क स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.तसेच मंडळाच्या विविध वाङ्मयीन योजनांची माहिती देखील मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेबाबत कळविण्यात आलेले आहे.तरी याबाबत संदर्भिय पत्र क्र.२ मधील सूचनांनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

तसेच सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी सदर आदेशान्वये दिलेल्या संबंधित सूचनांच्या अनुषंगाने संबंधित अकृषी / अभिमत/ स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे तसेच शासकीय / अशासकीय अनुदानित / विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित / मॉडेल डिग्री महाविद्यालये / वसतीगृहे व परिसंस्था यांना आपल्या स्तरावरून तात्काळ सूचना देण्यात याव्यात व त्याबाबत कार्यवाहीचा अनुपालन अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा.

(डॉ.अजिता शिंदे)
कनिष्ठ प्रशासन अधिकारी
शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत- १.मा.प्रधान सचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई-.
२.मा.सचिव ,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,प्रभादेवी मुंबई-४०००२५.यांना माहितीस्तव

Mr Junghare, DR(Acad)

आपल्या स्तरावरुन नियोजन करावे व संबंधितास निर्देशित करावे

मराठी विभाग
सर्व प्राध्यापक
Dr. Gadhe

5/1/2021

कार्यक्रम नियोजनाची तयारी करावी (मराठी विभाग CHB)

दिनांक १४ जानेवारी ते २८ जानेवारी, २०२१ या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
शासन परिपत्रक क्रमांक: मभापं-२०२०/प्र.क्र.१२५/भाषा-२
८ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : २२ डिसेंबर, २०२०.

वाचा :

१. मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्र.मभादि-२०१२/१८३/प्र.क्र.६१/भाषा-२, दि.१२.०४.२०१३
२.मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्र.मभापं-२०१५/प्र.क्र.७०/भाषा-२, दि.२२.०७.२०१५
३. मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्र. मभापं-२०१९/प्र.क्र.१११/भाषा-२, दि.१८.०९.२०२०

## -: शासन परिपत्रक :-

**प्रस्तावना :**

मराठी भाषेच्या वापरासंदर्भात शासकीय कार्यालयांबरोबर शैक्षणिक संस्थांचा सहभाग वाढावा म्हणून सन २०१३ पासून संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णय दि.१२.०४.२०१३ अन्वये दरवर्षी "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सन २०२१ पासून राज्यातील सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये/महामंडळे, केंद्र शासनाच्या अखत्यारीतील सर्व कार्यालये, मंडळे/महामंडळे, सार्वजनिक उपक्रम, सर्व खाजगी व व्यापारी बँका, सर्व शैक्षणिक संस्था/विद्यापीठे/महाविद्यालये इत्यादी सर्व संस्थांमधून राज्याची राजभाषा असलेल्या मराठी भाषेचा वापर जास्तीत जास्त व्हावा आणि मराठी भाषेचे संवर्धन व्हावे या हेतूने दरवर्षी "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" दि.१४ जानेवारी ते २८ जानेवारी या कालावधीमध्ये साजरा करण्याचा निर्णय संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" साजरा करण्याच्या अनुषंगाने विविध कार्यक्रम आयोजित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक :-**

**"मराठी भाषा संवर्धन पंधरवडा"** साजरा करताना मराठी भाषा विभागाच्या मराठी भाषेचा प्रचार व प्रसार या मुख्य धोरणास अनुसरुन दरवर्षी विविध कार्यक्रम आयोजित करण्याच्या सूचना देण्यात येतात. तथापि, सध्याच्या कोविड १९ या संसर्गजन्य रोगाच्या प्रादुर्भावामुळे प्रतिबंधात्मक उपाय म्हणून

संपूर्ण देशात काही निर्बंध घालण्यात आले आहेत. सदर निर्बंध लक्षात घेता, या कालावधीत मोठ्या प्रमाणात प्रत्यक्ष कार्यक्रम करता येणार नसले तरी, आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करुन जास्तीत जास्त कार्यक्रम ऑनलाईन पध्दतीने साजरा करता येतील. सदर कार्यक्रम साजरे करताना सामाजिक माध्यमे, दूरचित्रवाणी इ. माध्यमांच्या प्रभावी अंमलबजावणीतून मराठीचा प्रचार व प्रसार करता येईल. त्यानुसार कार्यक्रम आयोजित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत प्रस्तावनेत नमूद केलेल्या सर्व कार्यालयांनी त्यांना सुयोग्य असलेले कार्यक्रम आयोजित करुन पंधरवडा समारंभपूर्वक साजरा करण्यासाठी पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-

**अ) राज्यातील सर्व कार्यालयांनी करावयाचे कार्यक्रम :-**

ऑनलाईन कार्यक्रम ही कोविडच्या तथा आधुनिक तंत्रज्ञानाच्या पार्श्वभूमीवर काळाची गरज आहे. ही बाब विचारात घेता, मराठी भाषेच्या प्रचार व प्रसारासाठी खालीलप्रमाणे जास्तीत जास्त कार्यक्रम ऑनलाईन पध्दतीने साजरे करण्यात यावेत. **(जिथे प्रत्यक्षरीत्या कार्यक्रम करणे शक्य आहे, तिथे केंद्र शासन/राज्य शासन यांनी आखून दिलेल्या कोविड मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.)**

१) मराठी भाषेसंबंधी, वाङ्मयासंबंधी विविध परिसंवाद /व्याख्याने / कार्यशाळा /शिबीरे/ कविसंमेलने/ एकांकिका/ बालनाट्ये/ नाटके/ पुस्तक प्रकाशन समारंभ/ साहित्य पुरस्कार वितरण यांचे आयोजन करणे.

२) मराठी भाषेत निबंध/ प्रश्नमंजुषा/ कथाकथन/ चारोळीलेखन/ कथालेखन/ कवितालेखन/ हस्ताक्षर/ शुद्धलेखन/ वक्तृत्व/ घोषवाक्ये/ अभिवाचन/ वादविवाद/ अंताक्षरी/ शब्दकोडी/ मराठी साहित्यासंबंधी पुस्तकांचे रसग्रहण/ समीक्षण/ परिच्छेद अनुवाद इत्यादी स्पर्धा घेणे.

३) मराठी वाचन संस्कृती वाढावी याद्दष्टीने मराठी भाषेतील अभिजात ग्रंथांचा परिचय करुन देण्यासाठी मराठी भाषेतील तज्ज्ञ नामवंत व्यक्ती/ लेखक/ वक्ते यांच्याकडून मार्गदर्शन, परिसंवाद, कार्यशाळा यांचे आयोजन करणे.

४) ग्रंथ प्रदर्शन, ग्रंथदिंडी, कथाकथन, काव्यवाचन, माहितीपट इत्यादी साहित्यिक व सांस्कृतिक कार्यक्रम करणे.

५) वेगवेगळ्या क्षेत्रात यशस्वी असणाऱ्या मराठी भाषक व्यक्तींचा सत्कार, मुलाखती घेणे.

६) राज्यातील अमराठी भाषकांना मराठी भाषेचा सुलभ पध्दतीने परिचय करुन देण्याच्या दृष्टीने कार्यशाळा/ भाषेसंबंधी स्पर्धांचे आयोजन करणे.

७) मराठी भाषेच्या वापराबाबत जागरुकता निर्माण करण्याकरिता संबंधित कार्यालयांनी संकेतस्थळे, आकाशवाणी, दूरदर्शन, खाजगी दूरचित्रवाहिन्या, एफ.एम.रेडिओ, स्थानिक केबल नेटवर्क, फेसबुक, ट्विटर, व्हॉट्सॲप इ. आधुनिक प्रसार माध्यमातून याबाबतचे दृक-श्राव्य संदेश प्रसारित करावेत.

८) मराठी भाषेचा प्रचार, प्रसार व संवर्धन यासाठी विविध मार्गानी स्वयंप्रेरणेने काम करणाऱ्या व्यक्ती/ संस्था यांच्या कार्यास प्रोत्साहन देण्यासाठी त्यांच्या कार्याचा गौरव/ सत्कार करणे.

९) विश्वकोश निर्मिती मंडळाच्या संकेतस्थळावर नोंदी घेण्याबाबतच्या कार्यशाळेचे आयोजन राज्य मराठी विकास संस्थेद्वारे करण्यात यावे.

१०) टंकलेखनाकरिता युनिकोड मराठीचा जास्तीतजास्त वापर करण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रोत्साहित करावे.

११) यावर्षी कोविडची पार्श्वभूमी लक्षात घेता, तथा काळाची गरज लक्षात घेता, जास्तीत जास्त कार्यक्रम, चर्चासत्रे, प्रशिक्षण ऑनलाईन पध्दतीने करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मराठी भाषेचा प्रचार, प्रसार या उद्दिष्टांसह रोजगाराभिमुख उपक्रमातून जास्तीत जास्त तरुण पिढीला आकर्षित करण्यासाठी खालील विषयावरील तसेच अशा स्वरुपाच्या अन्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

१) अनुवादलेखन २) व्यावसायिक लेखन ३) पुस्तक निर्मिती व प्रकाशन प्रक्रिया
४) स्व-प्रकाशन ५) ई-बुक ६) ऑनलाईन पुस्तक विक्री ७) लेखक प्रकाशन करार
८) संहिता लेखन ९) विकिपिडिया कार्यशाळा १०) शॉर्ट फिल्म/डॉक्युमेंटरी लेखन

१२) डिजिटल साहित्य संमेलनाचे आयोजन करणे.

१३) प्रत्येक जिल्ह्यात पुस्तकाची जत्रा आयोजित करण्यात यावी. या जत्रेत लोक आपली पुस्तके निःशुल्क किंवा स्वस्त दरामध्ये इतरांना देऊ शकतील. तसेच, या जत्रेदरम्यान मराठीच्या प्रचार व प्रसारासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

१४) महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ नुसार वर्जित प्रयोजने वगळता शासकीय कामकाज १००% मराठी भाषेतून करणे आवश्यक आहे. तर, त्रिभाषा सूत्रानुसार राज्यातील केंद्र शासनाच्या अखत्यारीतील सर्व कार्यालये/सार्वजनिक उपक्रम यांनी मराठी भाषेचा वापर करणे अनिवार्य आहे. मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या निमित्तने शासनाकडून मराठी भाषेच्या प्रसार-प्रचाराबाबत वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले आदेश संबंधितांच्या पुन्हा एकदा निदर्शनास आणावेत तसेच सदर अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी होते किंवा कसे हे देखील तपासावे.

**ब) राज्यस्तरावर साहित्य संस्थांच्या मदतीने वरील "अ" प्रमाणे करावयाची कार्यवाही :-**

राज्यस्तरावरील कार्यक्रम सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ तथा राज्य मराठी विकास संस्थेने खालील साहित्य संस्थांच्या मदतीने सदर संस्थांच्या अंतर्गत येणाऱ्या जिल्ह्यांमध्ये कार्यक्रमांचे आयोजन करावे.

| अ.क्र. | साहित्य संस्था | साहित्य संस्थेच्या अंतर्गत जिल्हे |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे | नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली सोलापूर. |
| २ | मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद | औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर. |
| ३ | विदर्भ साहित्य संघ, नागपूर | बुलडाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली |
| ४ | कोकण मराठी साहित्य परिषद, रत्नागिरी | रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, ठाणे, पालघर, मुंबई उपनगर |
| ५ | दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर | कोल्हापूर |
| ६ | मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई | मुंबई शहर |

क) भाषा संचालनालयाने व महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाने तयार केलेल्या भ्रमणध्वनी उपयोजकाबद्दल (मोबाईल ॲप) तसेच मराठी भाषा विभागाच्या व त्या अंतर्गत कार्यालयांच्या संकेतस्थळाबद्दलची माहिती भाषा पंधरवड्याच्या निमिताने शाळा व महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांपर्यंत प्रसारीत करण्याची जबाबदारी चारही क्षेत्रीय कार्यालयांची राहील. चारही क्षेत्रीय कार्यालयांनी त्यांच्या फेसबुक पानावर या कार्यक्रमाची क्षणचित्रे प्रत्यक्षरित्या (Real time) अद्ययावत करुन प्रसिध्दी द्यावी. तसेच मराठी भाषा विभागाला याबाबत अवगत करावे.

ड) सर्व जिल्हाधिकाऱ्यांना वरीलप्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी भाषा संचालनालय, मुंबई, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई आणि राज्य मराठी विकास संस्था, मुंबई तसेच परिच्छेद "ब" येथे दर्शविलेल्या साहित्य संस्थांची मदत घेता येईल.

२. राज्यात तसेच जिल्हा स्तरावर त्यांच्या अखत्यारित असलेल्या कार्यक्षेत्रात वर दिलेल्या कार्यक्रमाप्रमाणे खालील कार्यालयांनी आयोजन करावे.

अ) मुंबई (मुख्यालय स्तरावर) - सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांच्या अधिपत्याखालील मुंबईतील शासकीय कार्यालये

आ) सर्व विभागीय आयुक्तांची कार्यालये

इ) सर्व जिल्हाधिकारी कार्यालये तसेच विविध विभागांच्या अधिपत्याखालील जिल्हास्तरीय कार्यालये

ई) मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद)-तालुकास्तरावर, ग्रामीणस्तरावर

उ) शासनाच्या अखत्यारितील कार्यालये/मंडळे/महामंडळे/सार्वजनिक उपक्रम,स्थानिक स्वराज्य संस्था

ऊ) शिक्षण संचालक/सर्व विभागीय सह संचालक/ उप संचालक/ जिल्हा शिक्षण अधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक/ प्रौढ शिक्षण व अल्पसंख्यांक) कार्यालये व त्यांच्या अधिनस्त कार्यालये

ए) सर्व संचालक (उच्च शिक्षण,तंत्र शिक्षण, ग्रंथालये) कार्यालये व त्यांच्या अधिनस्त कार्यालये,

ऐ) महाराष्ट्र राज्यातील केंद्र सरकारची सर्व कार्यालये व आस्थापना आणि महाराष्ट्र राज्यातील जनतेला बँकींग, दूरध्वनी, टपाल, विमा, रेल्वे, मेट्रो, मोनोरेल, विमान प्रवास, गॅस, पेट्रोलियम, कराधान,पारपत्र इत्यादी सेवा पुरविणारी अन्य कार्यालये.

३. या कार्यक्रमांकरीता येणारा खर्च संबंधित विभागाने/कार्यालयाने चालू वित्तीय वर्षासाठी मंजूर कार्यालयीन खर्चासाठीच्या आर्थिक तरतूदीतून अदा करावा.

४. सर्व साहित्य संस्थांकडून वरीलप्रमाणे कार्यक्रम आयोजित करण्यासाठी सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांना समन्वय अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे. समन्वय अधिकारी यांनी होणाऱ्या कार्यक्रमाची क्षणचित्रे आपल्या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन त्यास व्यापक प्रसिध्दी द्यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२०१२२२१५४०३५५०३३ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Prajakta Lavangare Verma

Digitally signed by Prajakta Lavangare Verma
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Marathi Language Department, postalCode=400032, st=Maharashtra, ...
Date: 2020.12.24 12:02:59 +05'30'

(प्राजक्ता लवंगारे-वर्मा)
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव,

२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,

३) मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,

४) मा.मुख्य सचिव / अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,

५) विरोधी पक्ष नेते, विधानपरिषद/विधानसभा, विधानमंडळ, मुंबई (पत्राने)

६) सर्व विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य/मराठी भाषा समिती सदस्य, विधानमंडळ, मुंबई (पत्राने)

७) सर्व विभागीय आयुक्त,

८) सर्व जिल्हाधिकारी,

९) कुलगुरु, सर्व विद्यापीठे,

महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
रवींद्र नाट्य मंदिर इमारत, दुसरा मजला,
पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५
दूरध्वनी क्र. ०२२ - २४३२५९२९/३१
संकेतस्थळ :- https ://sahitya.marathi.gov.in
ई - मेल : secretary.sblc-mh@gov.in

जा.क्र.सासंमं २०२०/ १७४७

दिनांक - ३१/१२/२०२०

प्रति,
मा.सहसंचालक,
उच्चशिक्षण,
पुणे उच्च शिक्षण मध्यवर्ती इमारत,
पुणे संचालनालय,
पुणे - ४११००१

विषय - दि. १४ जानेवारी ते दि. २८ जानेवारी, २०२१ या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त आयोजित करावयाच्या कार्यक्रमाबाबत.

संदर्भ - मराठी भाषा विभाग शासन परिपत्रक क्रमांक मभापं -२०२०/प्र.क्र. १२५/भाषा - २, दिनांक २२ डिसेंबर, २०२०

मा.महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भाकित विषयाच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, मराठी भाषेचा वापर जास्तीत जास्त व्हावा आणि मराठी भाषेचे संवर्धन व्हावे या हेतूने दरवर्षी मराठी भाषा संवर्धन पंधरवडा दि. १४ जानेवारी ते दि. २८ जानेवारी, २०२१ या कालावधीत साजरा करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाच्यावतीने घेण्यात आला आहे. मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्याच्या अनुषंगाने विविध कार्यक्रम आयोजित करण्याच्या सूचना शासनाच्या संदर्भाकित दिनांक २२ डिसेंबर, २०२० रोजीच्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत. मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या https ://sahitya.marathi.gov.in या संकेतस्थळाबाबतची माहिती महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपर्यंत प्रसारित करण्याचे निर्देश सदर शासन परिपत्रकान्वये देण्यात आले आहेत. आपल्या सुलभ संदर्भासाठी उपरोक्त शासन निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे.

शासनाच्य उपरोक्त परिपत्रकातील निर्देशाच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, मराठी साहित्य संस्कृती व कला या क्षेत्रांमध्ये महाराष्ट्रास लाभलेला थोर वारसा जतन व संवर्धन करण्यासाठी आणि विविध विषयांवरील मूलभूत संशोधन व प्रकाशन यांना उत्तेजन देण्याच्या हेतूने महाराष्ट्र शासनाने १९ नोव्हेंबर, १९६० मध्ये महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना केली. अशा तऱ्हेच्या मंडळाची मूळ संकल्पना महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतरावजी चव्हाण यांची होती. संपूर्ण भारतात राज्य पातळीवर स्थापन करण्यात आलेले साहित्य-संस्कृतीविषयक कार्य करणारे हे पहिलेच मंडळ होय. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या पुस्तक प्रकाशन योजनेअंतर्गत महाराष्ट्राचे साहित्य , संस्कृती आणि महाराष्ट्राचा इतिहास याविषयीच्या वैचारिक , समीक्षात्मक , चरित्रात्मक आदि ग्रंथांचे संपादन, संशोधन व प्रकाशन केले जाते याबरोबरच महाराष्ट्राच्या जडणघडणीत योगदान देणाऱ्या मान्यवर व्यक्तीचे चरित्रे महाराष्ट्राचे शिल्पकार या चरित्रेमालेअंतर्गत मंडळाकडून प्रसिद्ध केली जातात. मंडळाकडून वैविध्यपूर्ण विषयावर प्रकाशित केलेले महत्वपूर्ण असे संदर्भमूल्य असलेली मौलिक स्वरूपाची पुस्तके https ://sahitya.marathi.gov.in या संकेतस्थळावर ई - बुक व पीडीएफ स्वरूपात वाचाकांसाठी नि:शुल्क स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आली आहेत. याबरोबरच मंडळाच्या विविध वाङ्मयीन योजनांची माहिती देखील मंडळाच्या सदरच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. मंडळाच्या https ://sahitya.marathi.gov.in या संकेतस्थळावर नि:शुल्क उपलब्ध असलेल्या डिजीटायझ स्वरूपातील ई - बुक व पीडीएफ पुस्तकांचा लाभ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना घेता यावा, याकरिता मंडळाच्या https://sahitya.marathi.gov.in या संकेतस्थळाची माहिती आपल्या अधिनस्त महाराष्ट्रातील सर्व महाविद्यालये व विद्यापीठे यातील विद्यार्थ्यांपर्यंत प्रसारित करण्याबाबत आपल्या स्तरावरून संबधितांना निर्देशित करावे, ही विनंती. जेणेकरून मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आपले सहकार्य महत्वाचे ठरेल. तरी कृपया महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या संकेतस्थळाच्या माहितीचा प्रसार विद्यार्थ्यांपर्यंत करण्यासाठी सहकार्य करावे, ही पुन:श्च विनंती.

आपली विश्वासू,

(मीनाक्षी रा. पाटील)
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

सहपत्र - मराठी भाषा विभागाच्या परिपत्रक क्रमांक मभापं -२०२०/प्र.क्र. १२५/भाषा - २, दि. २२ डिसेंबर, २०२० ची प्रत.